**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१६०/ २०२२ मध्ये निशाणी क्र.१ खालील आदेश**

(श्री.राजाराम दत्ताराम घाडी विरुध्द तहसीलदार राजापूर, ता.राजापूर व ३)

अर्जदार यांनी सदरचा अर्ज अर्जदारचे आजोबा कै.शिवराम धाकू घाडी यांच्या मृत्यूची नोंद मृत्यू नोंदवहीच्या अभिलेखात होण्यासंबंधी आदेश होण्याकरीता दाखल केला आहे.

०२. अर्जदाराचे कथन असे की, त्यांची अर्जदारची आजोबा कै.शिवराम धाकू घाडी यांचा मृत्यू दि.१३/०८/१९५४ रोजी मौजे उपळे, ता.राजापूर येथे झालेला असून सदरचे गाव हे तहसीलदार राजापूर, पंचायत समिती राजापूर, ता.राजापूर, जि.रत्नागिरी यांचे व या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात येते. अर्जदार व त्याच्या कुटूंबीयांच्या अनावधानाने अर्जदारचे आजोबा कै.शिवराम धाकू घाडी हे मयत झाल्यानंतर त्यांच्या मृत्यूची नोंद करण्याचे राहून गेले होते. अर्जदार यांना अर्जदारचे आजोबा कै.शिवराम धाकू घाडी यांच्या मृत्यू दाखल्याची आवश्यकता सरकारी कामी आवश्यक असलेने अर्जदारने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. सदर अर्ज दाखल केल्यानंतर संबंधीत कार्यालयाचे म्हणजेच सामनेवाले क्र.१ ते ३ यांचे सदर नोंदी संबंधी म्हणणे मागविण्यात आले व अर्जाचे जाहीर प्रगटन करण्यात आले. त्याप्रमाणे सामनेवाला क्र.१ तहसीलदार राजापूर, ता. राजापूर यांनी

त्यांचे म्हणणे (नि.क्र.१०) दिले व सन १९५४ सालचे मृत्यू नोंदीबाबतचे अभिलेख उपलब्ध नसल्याने त्याबाबतचा अहवाल आपणास सादर करता येत नाही असे त्यांनी कळविले. सामनेवाला क्र.२ गटविकास अधिकारी, पंचायत समिती राजापूर, ता. राजापूर यांनी त्यांचे म्हणणे (नि.क्र.८) दिले व सदरची मृत्यू नोंद मृत्यू नोंदवहीत ३० दिवसाच्या आत होणे आवश्यक होते. परंतु सदरची मृत्यू नोंद ३० दिवसात झालेली नाही असे त्यांनी कळविले. सामनेवाले क्र.३ ग्रामसेवक ग्रामपंचायत उपळे, ता. राजापूर यांनी त्यांचे म्हणणे (नि.क्र.९) दिले व सन १९४६ सालचे रजिस्टर ग्रामपंचायतमध्ये उलपब्ध नसल्यामूळे अर्जदार यांना मृत्यू दाखला देवू शकलेले नाही असे त्यांनी कळविले. सदरील अर्जाचे जाहीर प्रगटन हे नि.क्र.२२ प्रमाणे 'दैनिक सागर' या वृत्तपत्राच्या रत्नागिरी आवृत्तीमध्ये दि.१४/०१/२०२३ रोजीच्या अंकात प्रकाशित करण्यात आले. तसेच नि.क्र.२१ प्रमाणे तहसिलदार, राजापूर, पंचायत समिती राजापूर, ग्रामपंचायत उपळे, ता.राजापूर तलाठी कार्यालय उपळे, ता.राजापूर यांच्या व या न्यायालयाच्या नोटीसबोर्डावर देखील प्रसिध्द करण्यात आले. अर्जाचे सदरील जाहीर प्रगटनाव्दारे या नोंदीबद्दल संबंधितांना जर काही आक्षेप असले, तर त्यांनी त्याबाबत या न्यायालयास लेखी कळविण्याविषयी सुचित करण्यात आले, परंतु, अदयापपावेतो असा कोणताही आक्षेप या न्यायालयास प्राप्त झालेला नाही.

०४. अर्ज व त्यातील कथने, या कामी हजर करण्यात आलेली कागदपत्रे व हजर केलेला पुरावा पाहता पुढील वादप्रश्न माझ्या विचारार्थ येतात व त्यावर मी

खालीलप्रमाणे सकारण निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अर्जदारने केलेली मागणी मान्य होण्यास अर्जदार पात्र आहे का | होय. |
| ०२. | आदेश काय | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुददा क्र.०१ करीता –**

**०५.** अर्ज व त्यातील कथने शाबीत करण्यासाठी अर्जदारने त्यांचे तोंडी जबाबाचे शपथपत्र नि.क्र.१३ वर नोंदविले आहे. ज्या मजकूराचा अर्जात उल्लेख आहे, तोच मजकूर अर्जदार यांनी त्यांच्या जबाबात पुन्हा सांगितलेला आहे. तसेच याकामी साक्षीदार लवू भिकाजी घाडी यांच्या जबाबाचे शपथपत्र नि.क्र.१४ वर नोंदविलेले आहे. अर्जदाराने त्यांच्या कथनांच्या पुष्ठर्थ तहसिलदार, राजापूर ता.राजापूर, जि.रत्नागिरी यांचेकडील दि.३१/१०/२०२१ रोजीचे मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र (नि.क्र.१६), गटविकास अधिकारी (वर्ग –०१), पंचायत समिती राजापूर ता. राजापूर यांचेकडील दि.३१/१०/२०२२ रोजीचे मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र (नि.क्र.१७), जन्म मृत्यू विवाह निबंधक ग्रामपंचायत उपळे यांचेकडील मृत्यू नोंदवही अनुपलब्धतेचे प्रमाणपत्र (नि.क्र.१८), अर्जदार यांच्या स्वतःच्या आधारकार्डची सत्यप्रत (नि.क्र.१९) याकामी हजर केलेली आहेत. अर्जदार यांनी महाराष्ट्र जन्म आणि

मृत्यू नोंदणी नियम, २००० मधील तरतुदी प्रमाणे अर्जदारची आजोबा कै.शिवराम धाकू घाडी यांच्या मृत्यू घटनेबाबतचा मृत्यू अहवाल (नमुना क्र.२) विहीत नमुन्यात भरुन या न्यायालयात नि.क्र.२० येथे दाखल केलेला आहे. सदर नि.क्र.२० वरील जन्म अहवाल (नमुना क्र.२) मधील तपशील खरा व बरोबर असल्याचे अर्जदार (नि. क्र.१३) व साक्षीदार लवू भिकाजी घाडी (नि. क्र.१४) यांनी शपथेवर सांगितले आहे.

०६. अर्जदारतर्फे देण्यात आलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा एकमेकास पुरक असून तो अबाधीत आहे. तसेच अर्जदारने जो अर्ज दाखल केला आहे, त्याबाबत जाहीर प्रगटन (नि.क्र.२१ व २२) दिल्यानंतर कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. तसेच सदर नोंद ही सन १९५४ च्या मृत्यू नोंद वहीत मिळून आलेली नाही. अर्जदारची आजोबा कै.शिवराम धाकू घाडी यांचा मृत्यू दि.१३/०८/१९५४ रोजी गाव मौजे उपळे, ता.राजापूर, जि.रत्नागिरी येथे झाल्याचे सदर साक्षीदारांने शपथेवर कथन केले आहे. सदर बाब अन्य कुणीही व्यक्तीने न्यायालयात येवून खोडून काढलेली नाही. त्यामूळे सकृत दर्शनी अर्जदारची आजोबा कै.शिवराम धाकू घाडी यांचा मृत्यू दि.१३/०८/१९५४ रोजी झाला आहे ही बाब सिध्द होते. तहसीलदार, राजापूर ता.राजापूर यांनी त्यांच्या म्हणण्यात (नि.क्र.१०), गटविकास अधिकारी, पंचायत समिती राजापूर, ता. राजापूर यांनी त्यांच्या म्हणण्यात (नि.क्र.८), व ग्रामसेवक ग्रामपंचायत उपळे यांनी त्यांच्या म्हणण्यात (नि.क्र.९) त्यांच्याकडे अर्जदारची आजोबा कै.शिवराम धाकू घाडी यांच्या मृत्यूची नोंद त्यांच्याकडील सन १९५४ च्या मृत्यू

नोंदवहीत नसल्याचे सांगितले आहे. यावरुन अर्जदारची आजोबा कै.शिवराम धाकू घाडी यांच्या मृत्यूची नोंद संबंधीत मृत्यूनोंद वहित झालेली नसल्याचे देखील स्पष्ट होते.

०७. सबब, अर्जदारची आजोबा कै.शिवराम धाकू घाडी यांच्या मृत्यूची नोंद संबंधीत मृत्यूनोंद वहीत झालेली नाही, असा निष्कर्ष निघतो. तसेच सदर मृत्यूची नोंद मृत्यू घटना घडल्यानंतर एक वर्षांनंतर करावयाची असल्याने जन्म आणि मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ च्या कलम १३(३) प्रमाणे 'ज्या कोणत्याही जन्माची किंवा मृत्यूची माहिती, तो घडल्यानंतर एक वर्षाच्या आत नोंदणी करण्यात आली नसेल त्याची नोंदणी जन्माचा किंवा मृत्यूचा तपशील बरोबर असल्याची खातरजमा करुन पाहिल्यानंतर प्रथम वर्ग दंडाधिकारी किंवा इलाका शहर दंडाधिकारी याने दिलेल्या आदेशाववरुन आणि विहीत फी भरण्यात आल्यावरच करण्यात येईल'. त्यामूळे, वर नमूद कारणासाठी अर्जदारने मागणी केल्याप्रमाणे अर्जदारचे आजोबा कै.शिवराम धाकू घाडी यांच्या मृत्यूची नोंद संबंधीत मृत्यू नोंदवहीमध्ये होण्याचे आदेश मिळण्यास ते पात्र आहेत. सबब, मुददा क्र.०१ चे उत्तर मी होकारार्थी देतो व माझी कारणे नोंदवितो.

**<u>मूददा क्र.०२ करीता –</u>**

०८. अर्जदारने मागणी केल्याप्रमाणे अर्जदारचे आजोबा कै.शिवराम धाकू घाडी यांच्या मृत्यूची नोंद सदरील मृत्यू नोंदवहीमध्ये होण्याचे आदेश मिळण्यास ते पात्र आहेत, असा निष्कर्ष मी वर उल्लेख केल्याप्रमाणे नोंदविलेला आहे. परिणामतः हा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मुददा क्र.०२ च्या उत्तरार्थ मी खालील आदेश पारित

करतो –

## आदेश

**०१.** सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**०२.** अर्जदार यांनी या न्यायालयात नि.क्र.२० येथे दाखल केलेले महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम, २००० मधील तरतुदी प्रमाणे विहीत नमुन्यातील त्यांचे अर्जदारचे आजोबा कै.शिवराम धाकू घाडी यांच्या मृत्यूबाबतचा मृत्यू अहवाल (नमूना क्र.२) हा या आदेशाचा भाग समजणेचा आहे.

**०३.** जन्म मृत्यू विवाह निबंधक तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत उपळे, ता.राजापूर व गटविकास अधिकारी (वर्ग –०१), पंचायत समिती राजापूर, ता.राजापूर, तहसिलदार, राजापूर यांना आदेश देणेत येतो की, त्यांनी आजोबा कै.शिवराम धाकू घाडी यांचा मृत्यू दि.१३/०८/१९५४ रोजी झालेची नोंद नि.क्र.२० वरील मृत्यू अहवाल (नमूना क्र.२) मधील तपशिलाप्रमाणे मृत्यू नोंदवहीमध्ये नियमानुसार विहीत शुल्क आकारुन करावयाची आहे.

**०४.** प्रस्तुत आदेशाचा वापर केवळ अर्जदारचे आजोबा कै.शिवराम धाकू घाडी यांचा मृत्यू दि.१३/०८/१९५४ रोजी झालेची नोंद मृत्यू नोंदवहीमध्ये होण्यासाठी करावयाचा आहे. त्याचा इतरत्र वापर करावयाचा नाही.

**दिनांक १५/०७/२०२३** **(सुरज सु. नलवडे)**
**ठिकाण- राजापूर** **सह न्यायदंडाधिकारी वर्ग-१ राजापूर**

"Judgment/Order in :- Criminal Misc. Appln. No.160/2022
I affirm that the contents of this Pdf file judgment/order are same words as per original judgment/order.
Name of Stenographer :- A.B.Patil
Court Name :- Civil & Criminal Court, Rajapur.
Date of Decision :- 15-07-2023
Judgment signed by P.O. on :- 15-07-2023
Judgment uploaded on :-17-07-2023"